# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडल, औरंगाबाद.

## प्रकरण क्र. सीजीआरएफ/एझेड/शहर/६६३/२०१८/०३

**(नोदंणी क्रमांक २०१८०१००३९)**

तक्रार दाखल दिनांक :- ०९.०१.२०१८
निकाल दिनांक :- ०३.०४.२०१८

**वापरकर्ता :** श्री. कपिल अे. वैष्णव तक्रारदार
**वीज ग्राहक :** श्रीमती विजयालक्ष्मी अरुणप्रसाद शुक्ल,
प्लॉट नं. १३६, शॉप नं.८,
मॅस्को कॉर्नर,सिडको,
औरंगाबाद.
(ग्राहक क्रमांक ४९००१२३१८८०१)

## विरुध्द

कार्यकारी अभियंता (प्रशासन), गैरअर्जदार
नोडल ऑफिसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म.
शहर मंडल,
औरंगाबाद.

## मंच

१ ) श्रीमती शोभा. बी. वर्मा अध्यक्षा
२ ) श्री. लक्ष्मण मु. काकडे सदस्य / सचिव
३ ) श्री. विलासचंद्र सु. काबरा सदस्य

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच -निर्णय

**१)** अर्जदार / **वापरकर्ता :** श्री. कपिल अे. वैष्णव, **वीज ग्राहक :** श्रीमती विजयालक्ष्मी अरुणप्रसाद शुक्ल, प्लॉट नं. १३६, शॉप नं.८, मॉस्को कॉर्नर, सिडको, औरंगाबाद हे महावितरणचे ग्राहक असून त्यांचा ग्राहक क्रमांक ४९००१२३१८८०१ असा आहे. त्यांनी गैरअर्जदार कार्यकारी अभियंता तथा नोडल ऑफिसर, महावितरण, शहर मंडल, औरंगाबाद यांचे विरुध्द महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ यातील परिशिष्ट -अ नमुन्यात दिनांक ०९.०१.२०१८ रोजी तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीचा थोडक्यात तपशिल खालील प्रमाणे आहे.

**अर्जदाराचे दिलेल्या दिनांक ०९.०१.२०१८ रोजीच्या निवेदनामध्ये म्हटले आहे की,**

२) नोव्हेंबर २०१६ ते मार्च २०१७ या कालावधीमधील चुकीची वीज बीले नविन मिटरच्या वापराप्रमाणे दुरुस्त करण्यात यावीत. ग्राहकाने वीज बिल दुरस्तीसाठी वेळोवेळी अर्ज दिलेले आहेत. वीज पूरवठा खंडीत करण्याच्या धमकीमुळे जादा बीले भरण्यात आलेली आहेत. ती बील दुरुस्ती मध्ये समाविष्ट करण्यात यावीत. ग्राहक ऑक्टोबर २०१७, नोव्हेंबर २०१७ व डिसेंबर २०१७ या कालावधीची बिले भरण्यास तयार आहे. ग्राहक मंचाकडुन केसचा निकाल लागेपर्यंत वीज पूरवठा खंडीत न करण्याच्या सुचना महावितरणला देण्यात याव्यात. अर्जदार यांनी दिलेल्या दिनांक २१.०३.२०१८ रोजीच्या पूरवणी निवेदना मध्ये म्हटले आहे की, नोव्हेंबर २०१६ ते मार्च २०१७ मध्ये मीटर जमा झाले.

**गैरअर्जदाराचे म्हणणे खालील प्रमाणे :**

३) श्रीमती विजयालक्ष्मी अरुणप्रसाद शुक्ला, ग्राहक क्रमांक ४९००१२३१८८०१ रा. शॉप नं.८, प्लॉट नं. १३६, मॉस्को कॉर्नर, सिडको, औरंगाबाद यांना सदर ठिकाणी चिकलठाणा उपविभागांतर्गत व्यावसायिक स्वरुपाचा विद्युत जोड दिनांक ०५.०६.२००७ रोजी देण्यात आलेला आहे. सदर आस्थापनेचा मंजूर भार हा देयकाप्रमाणे ०.४ के डब्ल्यु असा आहे.

४) अर्जदार यांना माहे नोव्हेंबर २०१६ मध्ये अवास्तव वीज देयक प्राप्त झाले मुळे त्यांनी त्याबाबत उपविभाग कार्यालयाकडे तक्रार दाखल केली. ग्राहकाच्या तक्रारीस अनुसरुन व महावितरण कंपनीच्या नियमाप्रमाणे ग्राहकाचा विद्युत मीटर क्रमांक १५०११३१ दिनांक ०३.०२.२०१७ रोजी चाचणी विभागामध्ये तपासण्यात आला. सदरचा मीटर OK असल्याचा अहवाल या कार्यालयास प्राप्त झाला. त्यानंतर ग्राहकाने मार्च २०१६ मध्ये रुपये ५०,०००/- महावितरण कंपनीकडे जमा केलेले आहेत. माहे

मार्च २०१६ चे देयक हे रुपये २,४०,४८०/- एवढे होते. त्यानंतर ग्राहकाने वरिष्ठ कार्यालयाच्या सुचनेनुसार माहे जून २०१७ एकुण रुपये ३,०५,११०/- पैकी रुपये ५०,०००/- आणि माहे सप्टेंबर २०१७ मध्ये एकुण रुपये ३,२७,१५०/- पैकी रुपये १,००,०००/- चा भरणा महावितरण कंपनीकडे केलेला आहे. तसेच वरिष्ठ कार्यालयाच्या सुचनेप्रमाणे सदर ग्राहकाचा मीटर क्रमांक १५०११३१ हा परत एकदा ग्राहकाच्या उपस्थितीत TQA प्रयोगशाळे मध्ये तपासण्यात आला. सदर प्रयोग शाळेने मिटरमधील Error ही Within Limit असल्याचा अहवाल दिलेला आहे. सदर अहवालावर ग्राहक प्रतिनिधीने सहया करण्यास नकार दिला.

५) ग्राहकाचा CPL तपासला असता ग्राहक त्याला प्राप्त झालेले देयक दरमहा अदा करीत नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. तसेच माननीय मंचाने दिनांक २३.०१.२०१८ रोजी दिलेलया निर्देशानुसार ग्राहकाने माहे सप्टेबर २०१७ ते माहे डिसेंबर २०१८ या कालावधीमधील फक्त चालू महिन्याचे देयक भरणे अपेक्षित होते. तथापि आजपर्यंत ग्राहकाने या कालावधी मधील चालु देयकांच्या रकमेपोटी रुपये ३३,१६७/- (रुपये तेहतीस हजार एकशे सदुसष्ट फक्त) चा भरणा केलेला आहे.

६) यावरुन असे निदर्शनास येते की, ग्राहक श्रीमती शुक्ला यांनी ज्या विद्युत मीटर बाबत शंका उत्पन्न करुन महावितरण कंपनीची देयके भरण्यास नकार दिलेला तो मीटर व्यवस्थीत असल्याचे निष्पन्न झालेले असल्याने ग्राहक श्रीमती शुक्ला यांना माहे नोव्हेंबर २०१५ पासून देण्यात आलेली सर्व देयके बरोबर आहेत व उर्वरित देयक भरण्यास आदेशीत करावे.

७) या केस मधील संपूर्ण कागदपत्रे आम्ही पाहिले, अर्जदार व गैरअर्जदार यांचे म्हणणे ऐकुण घेतले. खालील प्रमाणे मुद्दे विचाराधीन असून त्याची उत्तरे खालील व कारणमीमांसा खालील प्रमाणे आहे :-

| **अ.क्र.** | **मुद्दा** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | नोव्हेंबर २०१६ ते मार्च २०१७ पर्यंतची गैरअर्जदार यांनी तक्रारदारास दिलेली वीज बीले बरोबर आहेत का? | होय |
| २) | सदरील बिलांची दुरुस्ती करणे जरुर आहे का ? | ञाही |
| २) | काय हुकूम ? | अंतिम आदेशा प्रमाणे |

## कारणे

८) **मुद्दा क्रमांक १ व २ :-** नोव्हेंबर २०१६ ते मार्च २०१७ (थकबाकी सहित) गैरअर्जदार यांनी तक्रारदारास दिलेले बील रक्कम रुपये २,६१,१८०/- चे आहे. तक्रारदाराचे म्हणण्याप्रमाणे नोव्हेंबर २०१६ ते मार्च २०१७ या कालावधीचे बील चूकीचे आहे व ते दुरुस्त करतांना नवीन जे मीटर बसविले आहे त्या प्रमाणे वीज वापर धरण्यात यावा.

९) ग्राहकाचे लेजर पान क्रमांक ७८ व ७९ पाहता खालील प्रमाणे वीज वापर दिसून येतो. फेब्रुवारी १६ पासून दिसून येत आहे.

| महिना | युनिट्स |
|---|---|
| फेब्रुवारी २०१६ | ५५०२ (९ महिन्यांचे) |
| मार्च व एप्रिल २०१६ | ६११ |
| मे २०१६ | ४६७८ (३ महिन्यांसाठी, एक महिन्याचे १५५९) |
| जून २०१६ | १२६२ |
| जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर २०१६ | १४६० |
| ऑक्टोबर २०१६ | १०० |

१०) सप्टेबर २०१६ पावेतो मीटर क्रमांक ५५/जीटीएल/४४९८७ असा होता. ऑक्टोबर २०१६ मध्ये मीटर बदलण्यात आला असून तो क्रमांक ६५/०१५०११३१ होता. सदर मीटर बदलल्यानंतर नोव्हेंबर २०१६ - १५६९४ युनिट्स (५ महिन्यांसाठी) असा वीज वापर रेकॉर्ड झाला. त्यात नविन मिटरचे ११६९४ युनिट व जून्या मिटरचे राहिलेले ४००० युनिटचे ॲडजेस्टमेंट दाखविण्यात आले.

११) त्यानंतर मिटर मधील नोंदलेला वीज वापर खालील प्रमाणे आहे.

| महिना | युनिट्स |
|---|---|
| डिसेंबर २०१६ | ४४८९ |
| जानेवारी २०१७ | २८८१ |
| फेब्रुवारी २०१७ | ९१९ |
| मार्च २०१७ | ३७९९ |

असा वीज वापर लेजर दर्शविले, एप्रिल १७ मध्ये पुन्हा मीटर बदलण्यात आला व मीटर क्रमांक ७५/१४१९४६०१ असा बसविण्यात आला. त्यानंतर मिटर मधील नोंदलेला वीज वापर खालील प्रमाणे आहे.

| **महिना** | **युनिट्स** |
|---|---|
| एप्रिल २०१७ | ६७ |
| मे २०१७ | ५४१९ (दोन महिन्यांसाठी म्हणजेच एका महिन्यांसाठी २७०९) |
| जून २०१७ | ५१४ |
| जुलै २०१७ | २६८ |
| ऑगस्ट २०१७ | ५३९ |
| सप्टेबर २०१७ | ४०१ |
| ऑक्टोबर २०१७ | ४३० |

१२) एप्रिल २०१७ मध्ये मीटर बदल्यानंतर जरी विजेचा वापर कमी युनिट्स दिसतो तरीही युनिट बरोबर नोंदविलेले आहेत किंवा नाही यासाठी इतर अनेक सलग्न गोष्टी तपासणे जरुर आहे व पुढील व मागील वीज वापर तपासणे जरुर आहे. या केस मधील नोव्हेंबर २०१६ चे अगोदरचे काळातील वीज वापराचा तपशील पाहता मे २०१६ मध्ये एक महिन्यांकरीता सरासरी वीज वापर १५६० युनिट्स नोंदविला गेला आहे. जूने मीटर क्रमांक ५५/जीटीएल ४४९८७ या बाबत अर्जदार व गैरअर्जदार यांचा कोणताही वाद नाही. त्यामुळे नोंदले गेलेले युनिट्स बरोबर दिसतात. ऑक्टोबर २०१७ मध्ये बदलेले मीटर क्रमांक ६५/०१५०११३१ हे गैरअर्जदार यांची मीटर टेस्टींग लेबोरेटरीमध्ये तपासणेत आला व त्याच्या अहवालाची प्रत पान क्रमांक ८३ व ८७ वर दाखल आहे. दिनांक ३१.०२.२०१७ व ०८.०७.२०१७ च्या दोनही तपासणीत सर्व टेस्टमध्ये पास झाले असून बरोबर चालत होते असे दिसून येते. सबब, त्यामुळे या मीटरकडुन रेकॉर्ड झालेले युनिट चुकीचे आहेत असे म्हणता येणार नाही. ग्राहक प्रतिनिधी श्री. अख्तर अली यांनी असे प्रतिपादन केले की, नोव्हेंबर २०१६ ते मार्च २०१७ या काळात मीटर अवास्तव रिडींग एकदम दर्शवित होते (शुट होत होते) व त्यामुळे युनिट्स जास्त नोंदले गेले. मीटर क्रमांक ११३१ चे अहवाल पाहता सदर मीटर सुरळीत चालत होते असे दिसून येते, त्यामुळे श्री. अख्तर अली यांचे प्रतिपादन योग्य व ग्राहय नाही.

१३) तक्रारदार हा दुकान क्रमांक ८, प्लॉट क्रमांक १३६, सिडको येथे "छोटु वडापाव" या नावाने वडापावचे दुकान चालवितो. त्यासाठी लागणारे ओव्हन व इतर शीतकपाटाचा वापर नैसर्गिक आहे. तसेच त्याचे व्यवसायाचे स्वरुप पाहता रेकॉर्ड झालेले युनिट अपवाद आहेत असे म्हणता येणार नाही. सबब, संपुर्ण पूराव्याचा विचार करता फक्त एप्रिल २०१७ मध्ये मीटर बदलल्यानंतर कमी युनिट्सची नोंद झाली, या आधारावर नोव्हेंबर २०१६ ते मार्च २०१७ चे रेकॉर्ड झालेले युनिट चुकींचे आहे असा निष्कर्ष काढता येत नाही. सबब, तक्रारदाराचा व्यवसाय, मीटर बरोबर असणे व पुर्वीचे व मीटर बदलल्यानंतरचे युनिट्स लक्षात घेता तक्रारदाराचे म्हणणे तर्कसंगत नाही. त्यामुळे नोव्हेंबर २०१६ ते एप्रिल २०१७ चे वीज बील बरोबर दिसते व दुरस्तीची गरज नाही. सबब, मुद्दा क्रमांक १ चे उत्तर वीज बील बरोबर असले बाबत मुद्दा क्रमांक २ चे उत्तर वीज बील दुरुस्तीची गरज नाही असे नोंदले आहे.

१४) वरील बाबींची विचार करुन आम्ही असे मत नोंदवितो की, सदर तक्रारीत तथ्य नाही व ती नामंजूर करण्यात येत आहे. मुद्दा क्रमांक ३ चे उत्तरा दाखल खालील प्रमाणे हूकुम करीत आहोत.

# आदेश

१) सदर ग्राहकाची तक्रार नामंजूर करण्यात येत आहे.

२) अर्जदार व गैरअर्जदार यांनी खर्च आपआपला सोसावा.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत | स्वाक्षरीत | स्वाक्षरीत |
| श्रीमती शोभा बी. वर्मा | लक्ष्मण मु. काकडे | विलासचंद्र सु. काबरा |
| अध्यक्ष | सदस्य/सचिव | सदस्य |